प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

१.०१ संशोधनाची पार्श्वभूमी

१.०२ समस्येची निवड

१.०३ समस्या विधान

१.०४ संशोधनाची गरज व महत्त्व

१.०५ संशोधनाची उद्दिष्टे

१.०६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.०७ प्रकरणांचे नियोजन

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.०१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी

भारतीय घटनाकारांनी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनावर सोपवलेली आहे.घटनेच्या ४५ व्या कलमात असे नमूद केले आहे की घटना अंमलात आल्यापासून १० वर्षाच्या आत सरकारने १४ वर्षाखालील सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करावी. या तत्त्वाप्रमाणे १९६० पर्यंतच प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत होणे आवश्यक होते. १४ वर्षाखालील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे आणि शिक्षणाची सक्ती करणे हे काम मोठे होते. गेल्या २५ वर्षांत तरी शासनाला हे उद्दिष्ट साध्य करता आले नाही.

कामाचे व्यापक स्वरुप आणि आर्थिक टंचाई लक्षात घेऊन असे धोरण ठरविले की, मोफत आणि सक्तीचे शिक्षण टप्प्याटप्प्याने गाठवे. प्रथम ६ ते ११ वय गटातील विद्यार्थ्यांची सोय व नंतर ११ ते १४ पर्यंतच्या शिक्षणाची सोय करण्याचे ठरविले.

या धोरणामध्ये ८५ टक्के विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेतील अशी अपेक्षा होती. परंतु हे लक्ष्य साध्य करता आले नाही. हे लक्ष्य न होण्यापाठीमागे अनेक कारणे आहेत त्यापैकी काही कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) एक शिक्षकी शाळांचे प्रमाण ४० टक्के आहे.

२) सार्वत्रिक नाव नोंदणी न होणे.

३) स्थगन आणि गळती.

४) आर्थिक कारणे

५) सामाजिक कारणे

६) शैक्षणिक कारणे

७) शिक्षकांना दिली जाणारी अशैक्षणिक कामे

सन. १९५० मध्ये मुंबईचे तेव्हाचे मुख्यमंत्री कै.व.ग.खेर यांच्या अध्यक्षतेखाली

खास समिती नेमण्यात आली. या समितीने १९६० पर्यंत प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करावे असे सुचविले या सुचनेचा राज्य घटनेच्या ४५ व्या कलमात समावेश करण्यात आला.

घटनेच्या ४५ व्या कलमांनुसार सर्व मुलांना ती चौदा वर्षाची होई पर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार राज्यघट ना अमलात आल्यापासून (१९५०) दहा वर्षामध्ये करील (१९६०) असे कलमात म्हट ले होते. परंतु हे उद्दिष्टे आज पर्यंत ही साध्य झालेले नाही. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा कालावधी इ.स. १९६५ -६६, १९८६-२००० पर्यंत वाढविण्यात आला.

१९५२ मध्ये नेमलेल्या "माध्यमिक शिक्षण आयोगाने प्राथमिक शिक्षण ७ किंवा ८वर्षाचे (दोन विभागात ४ अधिक ३वर्षे किंवा ५ अधिक ३ वर्षे) असावे" अशी शिफारस केली.

१९६४-६६ मध्ये नेमण्यात आलेल्या 'कोठारी शिक्षण आयोगाने' निम्म प्राथमिक शिक्षणाचा टप्पा चार ते पाच वर्षाचा आणि उच्च प्राथमिक शिक्षणाचा टप्पा तीन तीन वर्षांचा म्हणजे एकूण सात ते आठ वर्षाचा प्राथमिक शिक्षणाचा कालावधी सुचविला.

१९६८ च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार घटनेच्या ४५ व्या कलमानुसार १४ वर्षापर्यंत सर्व मुलांना शिक्षण मिळविण्यासाठी आणि उच्च प्राथमिक शिक्षणाचा टप्पा तीन वर्षांचा म्हणजे एकूण सात ते आठ वर्षाचा प्राथमिक शिक्षणाचा कालावधी सुचविला.

१९६८ च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार घटनेच्या ४५ व्या कलमानुसार १४ वर्षापर्यंत सर्व मुलांना शिक्षण मिळण्यासाठी कसून प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले. त्याचबरोबर शाळेतील गळती व स्थगिती थांबविण्यासाठी कार्यक्रम सुचविले.

१९८६ च्या राष्ट्रोय शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक शिक्षणावर अधिक भर देण्यात आला. प्रत्येक शाळेत किमान सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक शाळेत कमीतकमी दोन खोल्या असतील. तेथे खेळणी, कला, नकाशे व तक्ते व इतर शैक्षणिक साहित्य असेल. प्रत्येक शाळेत दोन शिक्षक असतील या योजनेस खडू फळा मोहिम असे संबोधण्यात आले ही मोहिम देशात लागू केली.

१९४७ पर्यंतच्या प्राथमिक शिक्षणाच्या विकासाची दोन ठळक वैशिष्ट्ये आहेत.

१) घटनेच्या ४५ व्या कलमा प्रमाणे ६ ते १४ या सर्व वयोगटातील सर्व मुलांचे शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करावयाचे ह्या राष्ट्रीय उद्दिष्टाला प्राधान्यक्रम देण्यात आला.

२) शिक्षण पध्दतीचे स्वरुप असे बदलावयाचे की, ज्यामुळे उत्पादकतेच्या मुलभूत गरजेला उत्तेजन मिळेल ही प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे होती व ती जर साध्य झाली असती तर प्राथमिक शिक्षणात आमुलाग्र फरक दिसून आला असता. परंतु बराच प्रसार झाला तरी पहिले उद्दिष्ट साध्य झाले नाही. आणि दुस-या उद्दिष्टात लक्षणिय फरक पडला नाही.

प्राथमिक शिक्षणासाठी सर्व काही उपाययोजना करुन सुध्दा आपण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करु शकलो नाही.

## १.०२ समस्येची निवड

संशोधकाला असे वाटते की, प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य न होण्यास असंख्य कारणे आहेत. मग ती आर्थिक सामाजिक शैक्षणिक अशी कारणे कारणीभूत आहेत. त्यापैकीच प्राथमिक शिक्षकांना दिली जाणारी अशैक्षणिक कामे हा घटकही कारणीभूत आहे. शिक्षकांना दिल्या जाणा-या अशैक्षणिक कामामुळे शैक्षणिक नियोजन व प्रशासन यावर परिणाम होण्याची शक्यता असते.

अशैक्षणिक कामामुळे प्राथमिक शाळांचा दर्जा घसरल्याचे दिसून येते. यामुळे प्राथमिक स्तरावर शैक्षणिक नियोजन व प्रशासनामध्ये अनेक त्रुटी आणि उणिवा आढळतात.

सदर संशोधन हे परंडा तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांना कराव्या लागणा-या अशैक्षणिक कामाचा शैक्षणिक कार्यावर होणा-या परिणामांचा अभ्यास करीत आहे. संशोधक जि.प.कन्या प्रशाला, परंडा येथे माध्यमिक शिक्षक म्हणून काम करत आहे.

प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. त्यामुळे त्याला सर्वोच्च प्राधान्य देणे क्रमप्राप्त ठरते. प्राथमिक शिक्षणातील वरील समस्यांची जाणीव झाल्याने हा विषय निवडण्यास संशोधक उद्युक्त झाला.

अशैक्षणिक कामामुळे शालेय नियोजन व प्रशासनामध्ये येणा-या अडचणीचा शोध घेऊन त्यावर काही उपाय योजना करता येतील का? या दृष्टीने प्रस्तुत विषयाची निवड

केलेली आहे.

## १.०३ समस्या विधान

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालीलप्रमाणे केलेले आहे. **'प्राथमिक शिक्षकांना कराव्या लागणा-या अशैक्षणिक कामाचा शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम - एक चिकित्सक अभ्यास'**

संशोधन हे शास्त्रीय कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करतांना विशिष्ट संज्ञा विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. म्हणून संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधनाच्या वरील विधानात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

**१) प्राथमिक शिक्षक** :- इ.१ ली ते इ.७ वी पर्यंत अध्यापनाचे काम करणारे शिक्षक

**२) अशैक्षणिक कामे** :- प्राथमिक स्तरावर काम करीत असतांना शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक यांना अनेक प्रकारची अशैक्षणिक कामे करावी लागतात.

**उदा** :- १) जनगणना करणे.

२) मतदार याद्या बनविणे.

३) कुटुंब नियोजन कार्यक्रमात भाग घेणे.

४) निवडणूका पार पाडण्याचे प्रत्यक्ष काम करणे.

५) दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करणे.

६) पल्स पोलिओ कार्यक्रमात सहभाग घेणे.

७) पशुगणना करणे. इ. अशैक्षणिक कामांचा शालेय नियोजन, प्रशासन, संघटन इत्यादीवरती परिणाम होण्याची शक्यता असते.

**३) शैक्षणिक कार्य** :-

शिक्षणाच्या संदर्भात करावी लागणारी कामे म्हणजे शैक्षणिक कार्य होय.

**४) चिकित्सक अभ्यास** :-

वेगवेगळ्या संशोधन साधनांच्या साह्याने मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण

करुन अशैक्षणिक कामामुळे प्राथमिक स्तरावर शालेय नियोजन, प्रशासन यावर होणा-या परिणामांचा अभ्यास करुन सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सुचना अंमलात आणण्याचा प्रयत्न करणे.

## १.०४ संशोधन समस्येची गरज व महत्त्व

सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे प्राथमिक शिक्षण. प्राथमिक शिक्षणामुळे एकूणच समाजाचा व राष्ट्राचा दर्जा उंचावतो.

आज प्राथमिक शिक्षण निम्न प्राथमिक स्तर व उच्च प्राथमिक स्तर असे दोन टप्प्यात देण्यात येते. बहुतांशी प्राथमिक शिक्षण (८५टक्के) जिल्हा परिषद शाळांमार्फत देण्यात येते. शहरात हे काम नगर पालिका करतात. तसेच खाजगी संस्थेव्दारेही प्राथमिक शिक्षण दिले जाते.

मा. गट शिक्षणाधिकारी हा तालुक्याचा प्राथमिक शिक्षणाचा प्रशासन प्रमुख म्हणून काम करतो. त्यांच्या मदतीला शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख असतात.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या सर्वात खालच्या स्तरावर मुख्याध्यापक काम पाहतात. केंद्रीय शाळांकडून सतत मागविल्या जाणा-या माहितीची पूर्तता करण्यामुळे मुख्याध्यापक याच कामात गुंतून राहतात. त्याचबरोबर मुख्याध्यापक व शिक्षक यांना राष्ट्रीय कामे या नावाखाली लागणारी विविध अशैक्षणिक कामे करावी लागतात. अशैक्षणिक कामामुळे प्राथमिक स्तरावर शालेय नियोजन प्रशासन यावर होणा-या परिणामाच्या अभ्यासाने शालेय कामकाजाच्या स्वरुपाविषयी माहिती मिळणार आहे. या अभ्यासातून प्राथमिक शाळा रचना त्यावर केले जाणारे नियंत्रण काम करण्याची पध्दती कार्यालयीन रेकॉर्ड, शासकीय रिपोर्ट मुख्याध्यापक शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांशी संबंधित होणा-या समस्यांविषयी माहिती मिळणार आहे.

प्रस्तुत संशोधनात अशैक्षणिक कामामुळे शालेय नियोजन प्रशासन यांचा चिकित्सक अभ्यास करता येईल. त्यामधील गुणदोषांचा विचार करुन त्यावर उपयायोजना करता येतील.

अशैक्षणिक कामामुळे शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांना वैयक्तिक

मार्गदर्शनासाठी व शाळेचा विकास करण्यासाठी वेळ कमी पडतो. मनुष्यबळाची कमतरता भासते. त्यामुळे वरील घटकावरती कामाचा ताण पडतो. या अडचणी जाणून त्या दूर कशा करता येतील. यासाठी संशोधकाने सदर संशोधन करावयाचे ठरविले.

## १.०५ संशोधनाची उद्दिष्टे

१) प्राथमिक स्तरावर कोणकोणती अशैक्षणिक कामे करावी लागतात. हे पाहणे.

२) प्राथमिक स्तरावरील अशा अशैक्षणिक कामाचे स्वरुप समजून घेणे.

३) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा शालेय प्रशासनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

४) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा शालेय प्रशासनात निर्माण होणा-या समस्यांवर उपाय सुचविणे

५) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा शालेय नियोजनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

६) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामामुळे शालेय नियोजनात निर्माण होणा-या समस्यांवर उपाय सुचविणे.

७) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा शालेय अध्ययन अध्यापन कार्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

८) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा प्राथमिक शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

९) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा प्राथमिक शिक्षकांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

१०) प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामाचा प्राथमिक शिक्षकांच्या आर्थिक अवस्थेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

## १.०६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१) हे संशोधन प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामापुरते मयादित आहे.

२) हे संशोधन प्राथमिक स्तरावरील अशैक्षणिक कामामुळे शैक्षणिक नियोजन व प्रशासनावर

होणा-या परिणामापुरते मर्यादित आहे.

३) *हे संशोधन उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा तालुक्यापुरते तसेच जि.प.प्राथमिक शाळांपुरते* मर्यादित आहे.

४) हे संशोधन इ.१ ली ते इ.७वी पर्यंत मर्यादित आहे.

५) हे संशोधन सन.२०००-२००२ या सालापुरते मर्यादित आहे.

## १.०७ प्रकरणाचे नियोजन

प्रस्तुत संशोधनाचे नियोजन खालील प्रकरणात केलेले आहे.

**प्रकरण - १ ले :- प्रास्ताविक**

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी, समस्या निवडण्याची कारणे, समस्येचे शंब्दांकन, संशोधनाची उद्दिष्टे, समस्येची गरज व्याप्ती व मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रकरण - २ रे :- संबंधित साहित्य आणि संशोधनाचे समालोचन**

या प्रकरणात सबंधित साहित्य आणि संशोधनाचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनावर आधारित इतर संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला. संबंधित संशोधनाचे समालोचन करण्यात आले.

**प्रकरण - ३ रे :- प्राथमिक शाळेचे नियोजन आणि प्रशासन**

या प्रकरणात प्राथमिक शाळांतील नियोजन, प्रशासन व प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनातील घटक व त्याची कार्ये विषद केली आहेत.

**प्रकरण - ४ थे :- संशोधनाची कार्यपध्दती**

या प्रकरणात संशोधनाची पूर्वतयारी, संशोधनाची साधने, प्रश्नावली, मुलाखतीसाठीची प्रश्नसुची, संशोधनाची कार्यपध्दती याबाबतचे स्पष्टीकरण करण्यात आले.

**प्रकरण - ५ वे :- संकलित माहितीचे पृथ्थकरण व अर्थनिर्वचन**

या प्रकरणात माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि विशदीकरण केलेले आहे.

प्राथमिक शाळांचे शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच प्रत्यक्ष भेटी व निरीक्षण व विद्यार्थी गटचर्चा यांच्यामार्फत मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण व विशदीकरण करण्यात आले आहे.

**प्रकरण - ६ वे :- निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरुन केलेल्या विशदीकरणाच्या साह्याय्याने निष्कर्ष काढण्यात आले आहेत. या निष्कर्षाच्या साहाय्याने शिफारशी करण्यात आल्या आहेत व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आले आहेत.